माणूस अंर्तमुख होऊन विचारप्रवण झाला पाहिजे. त्यांनी आपल्या भाषणांत सुमारे सव्वाशे वर्षातील नाट्यक्षेत्राच्या स्थित्यंतराचा आढावा घेतला. संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश यलगुलवार यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

यानंतर त्र्यं.वि. सरदेशमुख रंगमंचावर गुरुवंदना ने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली "नाटयसंमेलनाध्यक्ष भाषणे" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर यक्षगान, गिरीजा कल्याण, तेलुगू लोककला कार्यक्रम सादर करण्यात आले. शेवटी मुंबईतील कलावंताचा सहभाग असलेला कलारजनी हा कार्यक्रम सादर करण्यात आला. यात मराठी रंगभूमीवरील मान्यवर आणि नामवंत कलावंत सहभागी झाले. रसिकांनी याला उदंड प्रतिसाद दिला.

त्यावेळी कै. नामदेव वठारे रंगमंचावर पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार, उदयपूर आणि सांस्कृतिक कार्य संचलनालय, महाराष्ट्र शासन आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आयोजित प्रायोगिक नाट्यमहोत्सव सादर करण्यात आला. महोत्सवाची सुरुवात गणेश स्तवनाने करण्यात आली. नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेतील अंतीम फेरीत निवडण्यात आलेल्या दहा एकांकिका तसेच सांस्कृतिक कार्य संचलनातर्फे निवडक एकांकिका सादर करण्यात आल्या. नाट्य परिषद मध्यवर्तीची "वर्ड मिन्स वर्ड", वझे केळकर महाविद्यालय, मुंबई यांची, "अस्वस्थ अपूर्णांकाचे पडघम", डि.जी. रुपारेल महाविद्यालय, मुंबई यांची "अंकलिपी" या एकांकिका सादर करण्यात आल्या. सायंकाळी नाटयसंमेलनाध्यक्ष मा. श्री. रमेश देव यांची प्रकट मुलाखत श्री. सुधीर गाडगीळ यांनी घेतली. या मुलाखतीत अध्यक्ष मोहन जोशी, आशालता आणि सौ. सीमा देव यांचाही सहभाग लाभला होता. पूर्ण मुलाखत ही चित्रपट केंद्रीत राहिली. चित्रपटांतील त्यांच्या किस्स्यांना रसिकांच्या टाळयांचा प्रतिसाद मिळत राहिला. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. सुशीलकुमार शिंदे, प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे, सोलापूरच्या महापौर श्रीमती. अरुणा वाकसे उपस्थित होत्या. यानंतर "आईनस्टाईन" हा प्रत्यय कोल्हापूर यांचा दिर्घांक, नाटय परिषद सोलापूर शाखा यांची "छेद", व रुईया महाविद्यालय, मुंबई याची "मुक्तीधाम" या एकांकिका सादर करण्यात आल्या.

कै. रा.ना. पवार रंगमंचावर "स्त्री विविधा", "लग्न काल आणि आज", "जीवनस्पर्शी पु.ल.", "अंधश्रध्दा गंमत घोळ", "भावनात्मक बदल", "धमाल लग्नाची", "म्युझिकल पेंटिंग", "३० फेब्रुवारी", "हा खेळ सावल्यांचा", "महाराष्ट्राचा हास्यसम्राट" इत्यादि एकपात्री कार्यक्रम सादर करण्यात आले. यानंतर "मराठी संगीत रंगभूमी बदलायला हवी" हा परिसंवाद रात्रौ पार पाडला. अभिनेत्री फैय्याज, किर्ती शिलेदार, अरविंद पिळगांवकर आणि ज्येष्ठ नाट्य समिक्षक श्री. वि. भा.देशपांडे इत्यादि मान्यवर या परिसंवादात सहभागी झाले. त्यानंतर संगीत संध्या व नाटयलोकधारा हे संगीतावर आधारीत कार्यक्रम सादर करण्यात आले.

कै. चंदूलाल श्रावण रंगमंचावर "सूर तेच छेडिता", "पुन्हा नको रे बाबा", "श्यामची आई" ही बालनाटये, दशावतार व सोकाजीराव टांगमारे हे वगनाटय सादर करण्यात आले.

**रविवार दिनांक २० जानेवारी २००८**

त्र्यं.वि. सरदेशमुख रंगमंचावर नॅशनल असो. फॉर ब्लाईंड, सोलापूर यांचा मराठी वाद्यवृंदाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.